पुण्य नगरी
बुधवार, १ ऑक्टोबर २०२५



# विवेकानंद कॉलेजमध्ये 'गरबा-दांडिया'

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सचेतना मंडळ आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवरंगी नवरात्र उत्सवानिमित्त गरबा-दांडिया नृत्य स्पर्धा उत्साहात झाल्या. यामध्ये ज्युनिअर व सिनिअर कॉलेज गटातील तेरा संघांनी सहभाग नोंदवून बहारदार नृत्य सादरीकरण केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेतील गटनिहाय विजेते अनुक्रमे असे, सिनिअर कॉलेज गट : सांस्कृतिक विभाग विद्यार्थी ग्रुप, नीलम पुरोहित व ग्रुप, वृषाली पाटील व ग्रुप. ज्युनिअर कॉलेज गट : बीट ब्रेकर्स ग्रुप, गुन्जू गर्ल्स व ग्रुप, देसी गर्ल्स ग्रुप. परीक्षक म्हणून स्टीवन पीतरस, नेहा भस्मे यांनी काम पाहिले. प्रास्ताविक डॉ. संपदा टिपकुर्ले, स्वागत प्रा. शिल्पा भोसले, सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. आभार डॉ. ए. एस. महात यांनी मानले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● बुधवार, दि. १ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये बेसिक्स ऑफ मायसोल वर व्याख्यान

जनप्रवास : कोल्हापूर

येथील विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स् (एंटायर) विभागाच्या वतीने द्वितीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी बेसिक्स ऑफ MySQL या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून शिवराज कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स, गडहिंग्लजचे प्रा.उमेश कानडे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना डेटाबेस आणि RDBMS या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. तसेच आवश्यक कौशल्ये आणि बाजारातील मागणी विषयावर माहिती दिली. विविध कंपन्यातील नोकरीसाठी आवश्यक असणारी मुलाखतीची तयारी कशी करावी हे सांगितले.

या व्याख्यानाचे आयोजन



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली बी.सी.एस विभागाने केले होते. बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स (एंटायर) विभागप्रमुख प्रा. पल्लवी देसाई यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजेश माने यांनी वक्त्यांची ओळख करुन दिली. प्रा.राधिका पाटील यांनी आभार मानले तर भार्गवी कुगजी यांनी सूत्रसंचालन केले. या व्याख्यानासाठी प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

पुढारी MY कोल्हापूर

गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५

# टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय प्रथम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत महिला व पुरुष टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या टेबल टेनिस पुरुष संघ अंतिम सामन्यात केआयटी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगवर मात करून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. संघाची इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेकरिता निवड झाली. या खेळाडूंना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी कोल्हापूर, गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद, दत्ताबाळ, पद्माराजे संघ विजेते

**मनपास्तर शालेय हॉकी स्पर्धा**

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेज, दत्ताबाळ मिशन स्कूल आणि पद्माराजे हायस्कूल संघांनी आपआपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून मनपास्तर शालेय हॉकी स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित ही स्पर्धा मनपाच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर सुरू आहे.

स्पर्धेच्या मुलांच्या १७ वयोगटात विवेकानंद कॉलेजने विमला गोएंका संघाचा २-० असा पराभव केला. विवेकानंदकडून पीयूष करडे व सार्थक राणे यांनी विजयी गोल केले. विवेकानंदच्या संघात अंकुश महेंद्रकर, हर्षवर्धन पाटील, सार्थक राणे, श्रीतेज कोंगेकर, शिवराज दिवे, वीर पाटील, मुजमिलखान बाबाखान, मयंक नलगे, पीयूष करडे, पार्थ तोडकर, युवराज टिपुगडे, गणेश लोखंडे, आराध्य जाधव, आयुष हवळ, हर्षवर्धन सुतार यांचा समावेश आहे. संघाला प्रशिक्षक संतोष कुंडले, साद मुजावर यांचे मार्गदर्शन लाभले.

१७ वयोगट मुलीत दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूलने महावीर इंग्लिश स्कूल २-१ असा पराभव केला. दत्ताबाळकडून अनन्या माहिडक व तनिष्का संकपाळ, तर महावीरकडून आंचल तेलबीने गोल केला. दत्ताबाळ स्कूलच्या संघात अनन्या माहाडिक, समायरा शेख, शिंधीका पाटील, सलोनी गायकवाड, श्रेयसी चौगुले, प्रिन्सी कांबळे, परिनीता घराटे, तनिष्का संकपाळ, जान्हवी कालेकर, ईश्वरी सूर्यवंशी, आराध्या चव्हाण, अभिलाषा गावडे, मनस्वी जोसेफ यांचा समावेश आहे. सर्वांना प्रशिक्षक समीर भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

१९ वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने छत्रपती शाहू महाराज हायस्कूल व ज्यु. कॉलेजचा २-० असा पराभव केला. परिणीता चव्हाण व इरा जाधवने प्रत्येकी एक गोल केला. विजयी संघात प्रसिद्धी कांबळे, सृष्टी पारगावकर, श्रेया खराडे, राजनंदिनी टिटोरकर, परिणिता चव्हाण, दीक्षा बिल्ले, दिया मोहिते, तनिष्का जाधव, गायत्री गोसावी, केतकी चव्हाण, कार्तिकी शिंदे, क्रांती मांगले, इरा जाधव, अर्पिता लोंढे, मधुरा भोसले, स्वरूपा पोवार यांचा समावेश आहे. सर्वांना प्रशिक्षक महेश सूर्यवंशी, श्वेता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.





कोल्हापूर : मनपास्तर हॉकी स्पर्धेत १७ व १९ वयोगटात विजेतेपद पटकाविणारे विवेकानंद कॉलेज, दत्ताबाळ मिशन स्कूल आणि पद्माराजे हायस्कूलचे संघ. सोबत मान्यवर, प्रशिक्षक, मार्गदर्शक व संयोजक.

पुण्यनगरी | गुरुवार,२ ऑक्टोबर २०२५ | कोल्हापूर

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची 'गोकुळ'प्रकल्पास भेट

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजच्या बी. कॉम. भाग-३ च्या ३५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या गोकुळ दूध प्रकल्पास औद्योगिक भेट दिली. यावेळी गोकुळ दूध संघाच्या सचिन लोहार व आशुतोष महेकर या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दूध प्रकल्पातील संपूर्ण प्रक्रियेची आणि दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती कशी केली जाते, याबद्दल माहिती दिली. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. या भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सनी काळे यांनी केले होते. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत डॉ. अमोल मोहिते, प्रा. ओंकार कुलकर्णी उपस्थित होते.

पुण्य नगरी
गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५

# 'विवेकानंद'चा टेबल टेनिस संघ विजेता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व पुरुष टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाचा पुरुष टेबल टेनिस संघ विजेता ठरला. अंतिम सामन्यात या संघाने केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगवर मात केली. या यशामुळे संघाची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे होणाऱ्या इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. महाविद्यालयाच्या विजयी संघातील अनिष सोनटक्के, भव्य शाह (बी.कॉम. ३), आदर्श पाटील (बी.ए. २), ऋषीकेश नलवडे (एम.कॉम. १), समर्थ चव्हाण (बी.एस.सी.सी.एस. २) या यशस्वी खेळाडूंना कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन करून प्रोत्साहन दिले.

तरुण भारत संवाद
गुरुवार,
२ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंदमध्ये 'गरबा-दांडियां'वर थिरकली तरुणाई



प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर मधील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे स्त्री अभ्यास केंद्र, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सखेतनी महळ आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवरंगी नवरात्री उत्सवानिमित्त गरबा-दांडिया नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर कॉलेज गटातील एकूण १३ संघांनी सहभाग नोंदवून बहारदार नृत्य सादरीकरण केले. या स्पर्धा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये झाल्या. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ.श्रुती जोशी, डॉ.कविता तिवडे, डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी, प्रा.सनी काळे, प्रा पल्लवी देसाई, डॉ.राजश्री पाटील, प्रा. गीतांजली साळुंखे, प्रा. सौ एस पी वेदांते यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ आर आर कुमार म्हणाले की, शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त गरबा व रास दांडिया स्पर्धेचे आयोजन म्हणजे स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर होय.

सदर स्पर्धेमध्ये सिनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक सांस्कृतिक विभाग विद्यार्थी ग्रुप, द्वितीय क्रमांक नीलम पुरोहित आणि ग्रुप व तृतीय क्रमांक वृषाली पाटील आणि ग्रुप यांनी मिळविला. तर ज्युनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक बीट ब्रेकर्स ग्रुप, द्वितीय क्रमांक गुज्जु गाईज व ग्रुप व तृतीय क्रमांक देसी गर्ल्स ग्रुप यांनी मिळविला. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिस रक्कम देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून स्टीवन पीलस व नेहा भस्मे यांनी काम पाहिले.

प्रास्ताविक स्त्री अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी केले. स्वागत प्रा.सौ शिल्पा भोसले यांनी केले. आभार डॉ ए.एस.महात यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. या, प्रसंगी ज्युनिअर व सिनिअर कॉलेजच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

गुरुवार, २ ऑक्टोबर २०२५



१७ वर्षाखालील मुलांचा विजयी संघ



१७ वर्षाखालील मुलींचा विजयी संघ.

# मुलांमध्ये विवेकानंद, मुलींमध्ये पद्माराजे विजयी

## मनपास्तर हॉकी स्पर्धा

प्रतिनिधी

कोल्हापूर

कोल्हापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मनपास्तर शालेय हॉकी स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांमध्ये विवेकानंद कॉलेज, मुलींमध्ये दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूल तर १९ वर्षे मुलींमध्ये पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने जेतेपद पटकावले. या स्पर्धा मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे झाल्या.

### १७ मुले अंतिम निकाल

विवेकानंद कॉलेजने विमला गोएंकाचा २-० ने पराभव केला. विवेकानंदकडून पियुष करडे व सार्थक राणे एक गोल केला.

विजयी संघात अंकुश महेंद्रकर, हर्षवर्धन पाटील, सार्थक राणे, श्रीतेज कोगेकर, शिवराज दिवे, वीर पाटील, मुजम्मिलखान बाबाखान मयंक नलवे, पीयूष करडे, पार्थ तोडकर, गुरुराज टिपुगडे, गणेश सोखंडे, आराध्य जाधव,आयुष हवड हर्षवर्धन सुतार या मुलांचा समावेश विजयी संघाला प्रशिक्षक संतोष कुंडले, साद मुजावर यांचे मार्गदर्शन लाभले.

### १७ वर्षे मुली अंतिम सामना :

दत्ताबाळ इंग्लिश मीडियम स्कूलने महावीर इंग्लिश स्कूल २-१ गोलने पराभव केला. दत्ताबाळकडून अनन्या महाडिक, तनिष्काने तर महावीरकडून आचल तेलवीने गोल केला.

विजयी संघात अनन्या महाडिक, समायरा शेख, रिधीमा पाटील, सलोनी गायकवाड, श्रेयसी चौगुले, प्रिन्सी कावळे, परिनीता घराटे, तनिष्का संकपाळ, जान्हवी कालेकर, ईश्वरी सूर्यवंशी, आराध्या चव्हाण, अभिलाषा गाडवे, मनस्वी जोसेफ या मुलींचा समावेश होता. विजयी संघाला प्रशिक्षक समीर भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

### १९ वर्षे मुली अंतिम सामना

पद्माराजे गर्ल्स हायस्कूलने छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्यु. कॉलेजचा २-० गोलने पराभव केला. पद्माराजेकडून परिणीता चव्हाण, इरा जाधवने १ गोल केला. विजयी संघात प्रगिती कांबळे, सृष्टी पारगावकर, श्रेया खराडे, राजनंदिनी टिटवेकर, परिणिता चव्हाण, दीक्षा बिरले, दिया मोहिते, तनिष्का जाधव, गायत्री गोसावी, केतकी चव्हाण, कार्तिकी शिंदे, ज्योति सांगळे, इरा जाधव, अर्पिता शिंदे, मधुरा भोसले, स्वरूपा पोवार प्रशिक्षक महेश सूर्यवंशी, श्वेता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

3/10/2025

3.10.25

तरुण भारत संवाद
शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५



# टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग साळोखेनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व पुरुष टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरचा टेबल टेनिस पुरुष संघ अंतिम सामन्यात के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, वर मात करून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. संघाची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे होणाऱ्या इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेकरिता निवड झाली. विवेकानंद महाविद्यालयाच्या संघात अनिश सोनटक्के, भव्य शाह, आदर्श पाटील, ऋषिकेश ननवडे, समर्थ चव्हाण हे विद्यार्थी असून यशस्वी खेळाडूंचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ.श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विश्वास जाधव, प्रा. संतोष कुडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रभात कांबळे, प्रा. सादिक मुजावर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के. धनवडे व श्री सुरेश चराफले यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची 'गोकुळ' प्रकल्पास भेट

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या बी. कॉम. भाग ३ च्या ३५ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या गोकुळ दूध प्रकल्पास औद्योगिक भेट दिली. यावेळी गोकुळ दूध संघाच्या सचिन लोहार व आशुतोष महेकर या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दूध प्रकल्पातील संपूर्ण प्रक्रियेची आणि दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती कशी केली जाते, याबद्दल माहिती दिली. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. या भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सनी काळे यांनी केले होते. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत डॉ. अमोल मोहिते, प्रा. ओंकार कुलकर्णी उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५





१) कोल्हापूर : मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या १९ वयोगटातील विजेत्या मुलांचा विवेकानंद कॉलेजचा संघ. २) १४ वयोगटातील महाराष्ट्र हायस्कूलच्या मुलींचा संघ. सोबत मान्यवर, संयोजक, प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# विवेकानंद कॉलेजला दुहेरी मुकुट

## मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा; मुलींत महाराष्ट्र हायस्कूल विजेता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

मनपा प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या १९ वयोगटात विवेकानंद कॉलेजने दुहेरी मुकुट पटकाविला. १४ वयोगट मुलींत महाराष्ट्र हायस्कूल संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचा प्रारंभ शुक्रवारी शिवाजी पेठेतील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या मैदानावर प्रारंभ झाला. संयोजन क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, क्रीडा शिक्षक संदीप पाटील आणि कोल्हापूर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने करण्यात आले.

१४ वयोगट मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र हायस्कूलने गुरुदेव विद्यानिकेतनचा ३-२ असा पराभव केला. विजयी संघात अंतरा व्हरकट, आराध्या वाळवेकर, हिना मुल्ला, वृंदा शिंदे, रुद्राक्षी शिंदे, भूमिका पाटील, परिणीता यादव, ज्ञानेश्वरी पाटील, आराध्या लिगाडे, आदिती शिंदे, आकांक्षा पवार, यशस्वी राजमाने यांचा समावेश आहे.

१९ वयोगट मुलींच्या अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने महाराष्ट्र हायस्कूलचा २-० असा पराभव केला. विजयी संघात अदिती मस्के, रिया गवळी, सोनिका पाटील, श्रावणी हिप्परगे, तनिष्का पाटील, ऋत्वी पाटील, साक्षी हवालदार, सिंधिका कदम, समृद्धी कोळी, समृद्धी भोसले यांचा समावेश आहे. मुलांच्या गटात विवेकानंद कॉलेजने महावीर कॉलेजचा २-० ने पराभव केला. विजयी संघात ओंकार कडपट्टी, मंत्र लोहार, यश पाटील, स्वयम पाटील, हर्ष सुतार, सर्वेश पाटील, मयुरेश काशीद, अथर्व पोवार, अभिषेक सोनुले, पृथ्वीराज मालिकवाडे, समर्थ भोसले, आदित्य चव्हाण यांचा समावेश आहे.

**पुढारी MY कोल्हापूर** शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५

### विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महात्मा गांधीजींच्या व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे गणित विभागप्रमुख डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. दत्ता जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागातर्फे करण्यात आले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• शनिवार
दि ४ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंदमध्ये महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन



राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना डॉ. दत्ता जाधव. सोबत डॉ. दत्ता जाधव आदी.

जनप्रवास : कोल्हापूर

विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते फोटोपूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. दत्ता जाधव यांनी केले.

जाधव म्हणाले, सत्य, अहिंसा, सत्याग्रह या संकल्पना जगासमोर मांडल्या. या तत्वांना महात्मा गांधी यांनी जीवनात खूप महत्व दिले. धर्मनिरपेक्षता आणि मानवता यांच्याबरोबर संघटितपणा यासाठी महात्मा गांधी यांनी विचारसरणी आजही उपयुक्त आहे. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान हा नारा देऊन संपूर्ण शेतकऱ्यांना सबल करण्याचे कार्य केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी | रविवार, ५ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद महाविद्यालय

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमापूजन गणित विभागप्रमुख डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. दत्ता जाधव यांनी केले. ते म्हणाले, महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा व सत्याग्रह या चिरकालीन संकल्पना जगासमोर मांडल्या. या तत्त्वांना महात्मा गांधी यांनी जीवनात खूप महत्त्व दिले. धर्मनिरपेक्षता आणि मानवता याचबरोबर संघटितपणा यासाठी गांधीजींची विचारसरणी आजही उपयुक्त आहे. दरम्यान, महात्मा गांधी जयंती स्वच्छता सप्ताहानिमित एनएसएस आणि एनसीसी विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाने केले.

लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५

# शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत विवेकानंद दुहेरी विजेते

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर शुक्रवारपासून सुरू झालेल्या मनपास्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात विवेकानंद कॉलेजच्या संघाने दुहेरी विजेतपद पटकावले. महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे या स्पर्धा सुरू आहेत.



कोल्हापुरात महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात विवेकानंद कॉलेजच्या संघाने दुहेरी विजेतेपद पटकावले.

१४ वर्षे मुलींच्या गटात अंतिम सामन्यात महाराष्ट्र हायस्कूलच्या संघाने ३-२ फरकाने श्री गुरुदेव विद्यानिकेतन संघावर मात केली. विजयी संघात अंतरा करकट, आराध्या वाळवेकर, हीना मुल्ला, वृंदा शिंदे, रुद्राक्षी शिंदे, भूमिका पाटील, परिणिता यादव, ज्ञानेश्वरी पाटील, आराध्या लिगाडे, आदिती शिंदे, आकांक्षा पवार, यशस्वी राजमाने यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक संदीप पाटील, अभिजित राणे यांचे मार्गदर्शन लाभले.

१९ वर्षे मुलींच्या गटात अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने महाराष्ट्र हायस्कूलचा २-० ने पराभव केला. विजेत्या संघात अदिती मस्के, रिया गवळी, संचिता पाटील, श्रावणी झिप्परगे, तनिष्का पाटील, कृत्वी पाटील, साक्षी हवलदार, विविका कदम, समृद्धी कोळी, समृद्धी भोसले यांचा समावेश होता. त्यांना प्रशिक्षक प्रा. संतोष कुंडले, प्रा. साद मुजावर, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

१९ वर्षे मुलांच्या गटात अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने महावीर कॉलेजचा २-० ने पराभव केला.



कोल्हापूर : मनपा स्तर शालेय कबड्डी स्पर्धेत १४, १७ व १९ वयोगटात अजिंक्यपद पटकावणारे वसंतराव देशमुख हायस्कूल, दत्ता बाळ हायस्कूल, वालावलकर हायस्कूल व विवेकानंद कॉलेजचे मुला-मुलींचे संघ. (छाया : पप्पू अत्तार)

# देशमुख, दत्ता बाळ, वालावलकर, विवेकानंद संघ विजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चुरशीच्या अंतिम सामन्यात वसंतराव देशमुख हायस्कूल, दत्ता बाळ हायस्कूल, वालावलकर हायस्कूल व विवेकानंद कॉलेज यांनी प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून मनपास्तर कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले.

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मनपा स्तर कबड्डी स्पर्धा छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल येथील कबड्डी मैदानावर स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक विजयी संघांना प्रा. सचिन पुजारी, विशाल जाधव व प्राध्यापक देवेंद्र डांगोळे यांच्याकडून ट्रॉफी देण्यात आली.

१४ वयोगट मुलांच्या अंतिम सामन्यात दत्ता बाळ हायस्कूल संघाने व ज देशमुख इंग्लिश स्कूलच्या ३४-२९ असा पराभव केला. विजयी संघात आविष्कार दिंडे, साहिल अडसूळ, श्लोक संकपाळ, राजवीर साळुंखे, शौर्य कांबळे, शिवराज भस्मे, वेदांत बागडे, विराट पाटील, निषप सय्यद, उत्तम कात्रट, पीयूष पुणे यांचा समावेश होता.

१४ वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात व देशमुख हायस्कूलने शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूलचा २८-५ असा एकतर्फी पराभव केला. विजयी संघात ऋतुजा तगारे, आराध्या कांबळे, स्वरा कदम, श्रेया चव्हाण, कादंबरी चव्हाण, दिव्या गुरव, आदिती कमलाकर, वैभवी हुजरे, राहील लांबोरे, काव्या पाटील यांचा समावेश आहे.

## मनपास्तर शालेय कबड्डी स्पर्धा

१७ वयोगटातील मुलींच्या अंतिम लढतीत शा. कृ. पंत वालावलकर हायस्कूलने शहाजी कॉलेजचा १४-१२ असा पराभव केला. विजयी संघात अपेक्षा येडगे, सृष्टी पाटील, समीक्षा पाटील, सई खराडे, श्रुतिका वायंगणकर, श्रावणी बोडके, वैदही पाटील, रितिका जाधव, भक्ती कुंभार, धनश्री खोंदल, स्नेहा खापणे, देवप्रिया एम. व्ही. यांचा समावेश आहे.

१९ वयोगटातील मुलींच्या अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने कमला कॉलेजवर २३-१९ अशी मात केली. विजयी संघात आसावरी थोत्रे, सायली पाटील, सायली मोरे, साक्षी हवालदार, समीक्षा पोवार, श्रुती भोसले, श्रावणी मराठे, शीतल कोकरे, गौरी गोसावी, ऐश्वर्या वटकर, ज्योती मिरका यांचा समावेश.

पुण्यनगरी

बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद 'मध्ये राष्ट्रीय स्तर परीक्षांबाबत मार्गदर्शन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात सर्व शास्त्र विभागांच्या वतीने आयआयटी-जॅम (IIT-JAM) आणि गेट (GATE) या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आयआयटी मुंबईचे तज्ज्ञ रामानंद सिंग यादव आणि भूपिंदर कौर यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय लठ्ठे यांनी केले. यावेळी वक्त्यांनी परीक्षेची रचना, गुणांकन पद्धती, विषयानुसार तयारीचे नियोजन, तसेच वेळेचे व्यवस्थापन या बाबींविषयी सविस्तर माहिती दिली. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. आभार प्रा. डॉ. अर्जुन कुंभार यांनी मानले.

8.10.25

# ऋषीकेश कबनूरकर, शर्वरी कबनूरकर विजेते

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ विभागीय बुद्धिबळ स्पर्धा गडहिंग्लज येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात झाली. स्पर्धेत ११८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. पुरुष गटात ऋषीकेश कबनूरकर, तर महिलांत शर्वरी कबनूरकर यांनी अजिंक्यपद पटकाविले. सर्व खेळाडूंची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन दिनकरराव के. शिंदे स्मारक ट्रस्टचे सल्लागार महेश कोरी यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी विभागीय क्रीडा सचिव डॉ. नीलेश पाटील, शारीरिक संचालक सागर शिंदे उपस्थित होते. पंच म्हणून कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे माजी सचिव कृष्णात पाटील, शैलेश होनकट्टी यांनी काम पाहिले. संयोजन प्रा. शरद किल्लेदार व सहकाऱ्यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विभागीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन करताना महेश कोरी व प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे. यावेळी उपस्थित डॉ. नीलेश पाटील, शारीरिक संचालक सागर शिंदे, कृष्णात पाटील, शैलेश होनकट्टी आदी.

स्पर्धेचा अनुक्रमे निकाल असा : पुरुष गट : ऋषीकेश कबनूरकर (विवेकानंद कॉलेज), अमोल बागलकोट (न्यू कॉलेज), सारंग पाटील (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स), तन्मय पोवार (डीकेटीई कॉलेज), आदित्य सावळकर व राहुल लोखंडे (यू.जी., पी.जी. डिपार्टमेंट शिवाजी युनिव्हर्सिटी). महिला गट : शर्वरी कबनूरकर (के.आय.टी. कॉलेज), मयुरी झावळकर (सायबर कॉलेज), सृष्टी कुलकर्णी (विवेकानंद कॉलेज), वैष्णवी पाटील (डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स), मुक्तांजली सावंत (विवेकानंद कॉलेज), दिशा पाटील (डीकेटीई कॉलेज).

पुण्यनगरी
नगरी
शुक्रवार, १० ऑक्टोबर २०२५ ॥ कोल्हापूर

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये वन्यजीव सप्ताह उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह दि. १ ते ४ ऑक्टोबरदरम्यान उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्षीच्या थिमद्वारे वन्यजीव संवर्धनासाठी आर्थिक गुंतवणुकीचे महत्त्व आणि निसर्ग व मानव यांच्यातील संतुलन राखण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. सप्ताहादरम्यान रांगोळी, प्राणी छायाचित्रण, क्राफ्ट मॉडेल, पोस्टर सादरीकरण, फेस अँड हँड पेंटिंग, प्रश्नमंजूषा आणि लघुचित्र अशा विविध स्पर्धा झाल्या. समारोपप्रसंगी इकोएस, पुणे येथील पर्यावरण सल्लागार डॉ. श्रुती कुलकर्णी यांचे प्रेरणादायी अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. हा उपक्रम प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. १७० विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला, तर सुमारे ३०० विद्यार्थी आणि ५५ शिक्षकांनी भेट देऊन कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. कार्यक्रमानंतर सर्व विजेते आणि सहभागी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

-10-25

पुण्य नगरी

| शनिवार, ११ ऑक्टोबर २०२५ | कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजचा बुद्धिबळात डंका

## महिला गट विजेता; पुरुष गटात तृतीय स्थान



कोल्हापूर : बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरचा विजेता संघ. सोबत मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, भडगाव (गडहिंग्लज) यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व पुरुष बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरचा महिला बुद्धिबळ संघ विजेता ठरून या संघाने जनरल चॅम्पियनशिप पटकावली, तसेच पुरुष गटात तृतीय क्रमांकाचा मान मिळवत विवेकानंद कॉलेजने दुहेरी यश मिळवले.

महिला विभागात सृष्टी कुलकर्णी (बी.बी.ए. भाग ३) हिने तृतीय क्रमांक, मुक्तांजली सावंत (बी.कॉम. भाग ३) हिने पाचवा क्रमांक मिळवला. पुरुष विभागात ऋषीकेश कबनुरकर (बी.कॉम. भाग १) याने प्रथम क्रमांक पटकावत कॉलेजचा झेंडा उंचावला. या यशस्वी खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

11.10.25

सकाळ TODAY ७
कोल्हापूर, सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५

# ‘विद्यापीठ’, ‘विवेकानंद’ला विजेतेपद

## विभागीय बुद्धिबळ स्पर्धा : डीकेटीई, विवेकानंद, भारती कॉलेजचेही यश

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १२ : भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय पुरुष व महिला बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात झाल्या. पुरुष गटात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने, तर महिला गटात विवेकानंद महाविद्यालयाच्या (कोल्हापूर) संघाने विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचा अन्य निकाल असा : पुरुष गटात डीकेटीई इचलकरंजी द्वितीय, तर विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. महिला गटात द्वितीय डी.के.टी.ई. इचलकरंजी व भारती अभियांत्रिकी महाविद्यालय कोल्हापूरने तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे उद्घाटन दिनकरराव के. शिंदे स्मारक ट्रस्टचे सल्लागार महेश कोरी यांच्याहस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे होते. झोनल क्रीडा सचिव डॉ. नीलेश पाटील प्रमुख पाहुणे होते. एकूण ११८ स्पर्धकांनी या स्पर्धेत उत्साहाने सहभाग नोंदविला. विविध वरिष्ठ महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण संचालक तसेच इचलकरंजी चेस अॅकॅडमीच्या सदस्यांनी स्पर्धेचे नियोजन केले. डॉ. ए. डी. शिंदे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे शारीरिक संचालक सागर शिंदे यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

यावेळी कोरी म्हणाले, ‘स्पर्धा ही खिलाडू वृत्तीने खेळली पाहिजे. कारण खेळ आपल्याला जीवनातील चढउतारांचा सामना करण्याचे धडे देतात.’ प्राचार्य डॉ. घेवडे यांचेही भाषण झाले. प्रा. शरद किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले.



**भडगाव :** विद्यापीठ विभागीय बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन महेश कोरी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. डी. व्ही. घेवडे, डॉ. नीलेश पाटील, सागर शिंदे आदी उपस्थित होते.

13-10-25

हॅलो प्रभात

# व्यावसायिक क्षेत्रामध्ये 'इंग्रजी भाषेचे महत्त्व' वर व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : हॅलो प्रभात

आधुनिक युगात कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी इंग्रजी भाषेचे कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सायबर कॉलेजच्या तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. सुनिता दलवाई यांनी विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यानात केले. बी.एस्सी. कॉम्प्यूटर सायन्स (एंटायर) व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. दलवाई यांनी इंग्रजी ही केवळ भाषा नसून यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना संवादकौशल्य व तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असल्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे



प्रास्ताविक प्रा. माधुरी पवार यांनी केले, स्वागत प्रा. पल्लवी देसाई यांनी केले. आभार प्रदर्शन कु. भूमी चौगुले हिने केले. सूत्रसंचालन कु. श्वेता पाटील आणि कु.संकेत पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. डॉ.कविता तिवडे, डॉ.श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस.के.धनवडे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

हॅलो प्रभात

# 'ब्लुम टेक्सोनॉमी'द्वारे प्रभावी प्रश्नपत्रिका निर्मितीचे मार्गदर्शन : डॉ. उत्तम जाधव



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेजच्या परीक्षा विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तर्फे 'प्रश्नपत्रिका तयार करण्याची मुख्य संकल्पना आणि मार्गदर्शन' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. मुख्य अतिथी डॉ.उत्तम जाधव यांनी ब्लुम टेक्सोनॉमी पध्दतीद्वारे प्रश्नपत्रिका तयार करण्याची प्रभावी पद्धत, प्रश्नांचा स्तर निश्चिती व मुल्यमापनातील उपयोग याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी परीक्षेची स्वायत्तता जपत प्रश्नपत्रिकेत नव्या संकल्पनांचा वापर गरजेचा असल्याचे सांगितले. शिबीराचे आयोजन समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जी.जे.नवाथे यांनी, सूत्रसंचालन प्रा. माधुरी पवार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. शिबिरास प्राध्यापक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

epaper.helloprabhat.in
15 Oct 2025 - Page 3

पुण्यनगरी | ■ गुरुवार, १६ ऑक्टोबर २०२५

# 'विवेकानंद 'तर्फे पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत

कोल्हापूर : शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने सोलापूर जिल्ह्यातील करमळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मदत केली. कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी सढळ हाताने मदत केली. एकुण रुपये १ लाख २८ हजार ६३० रुपये इतकी रक्कम मदत म्हणून देण्यात आली. यावेळी करमाळा, सोलापूर येथील विविध भागात जाऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी करून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना संक, वह्या, फराळाचे पदार्थ वाटप केले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडे खरेदीसाठी रक्कम वर्ग करण्यात आली. यावेळी डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए. एस. कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस. एस. अंकुशराव, प्रा. ए. बी. वसेकर, एस. के. घनवडे उपस्थीत होते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

• गुरुवार
दि. १६ ऑक्टोबर २०२५

# विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावे : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार

**जनप्रवास : कोल्हापूर**

डॉ. ए.पी.जे .अब्दुल कलाम विद्यार्थी प्रेमी, उत्तम वाचक होते. त्यांचा आदर्श समोर ठेवत विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांच्या आहारी न जाता वाचनाकडे वळावे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर कुंभार यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेज मधील ग्रंथालय मराठी विभाग एनसीसी व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. डॉ. ए.पी.जे .अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा केला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या परिपत्रकानुसार संविधानातील उद्देशिका ,मूलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन विद्यार्थी व प्राध्यापक यांनी केले.

विद्यार्थिनी श्रावणी अळसूळ हिने मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले. सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. एनसीसी प्रमुख प्रा. मेजर सुनिता भोसले, प्रा. रोहिणी रेळेकर आदी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५

१

# करमाळ्यातील विद्यार्थ्यांना विवेकानंदतर्फे मदत



जनप्रवास : कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने राज्यातील पूरग्रस्त भागातील सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मदत केली. त्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी स्वइच्छेने पैसे जमा केले. एकूण रुपये १ लाख २८ हजार ६३० इतकी रक्कम जमा झाली.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी केली. सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यामधील

## ● १ लाख २८ हजार रूपयांची मदत

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सॅक, वह्या, फराळाचे पदार्थ आदी साहित्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडेखरेदीसाठी रक्कम वर्ग केली. यामध्ये एनएसएस, राष्ट्रीय छात्र सेना यानी पुढाकार घेतला. उपक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शना खाली डॉ. एस. पी. थोरात, डॉ.श्रुती जोशी, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए एस कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस. एस. अंकुशराव, प्रा. ए. बी. वसेकर, एस के धनवडे यांनी केले.

पुढारी
शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५

# पूरग्रस्त विद्यार्थ्यांना 'विवेकानंद'तर्फे मदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने पूरग्रस्त भागातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (करमाळा, जि. सोलापूर) येथील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी १ लाख २८ हजार रुपयांची मदत केली.

करमाळा, सोलापूर येथील विविध भागात जाऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी करून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय(करमाळा, जि. सोलापूर) येथील विद्यार्थ्यांना सॅक, वह्या, फराळाचे पदार्थांचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडे खरेदीसाठी रक्कम वर्ग करण्यात आली. उपक्रमाचे संयोजन डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए. एस. कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एम. एस. अंकुशराव, प्रा. ए. बी. वसेकर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी केले.

तरुण भारत
शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. अब्दुल कलाम जयंती

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज मधील ग्रंथालय मराठी विभाग एनसीसी व एनएसएस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी संविधानातील उद्देशिका, मूलभूत अधिकार व कर्तव्य यांचे वाचन विद्यार्थी व प्राध्यापक यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार असे म्हणाले की डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम हे विद्यार्थी प्रेमी, उत्तम वाचक होते. त्यांचा आदर्श समोर ठेवत विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांच्या आहारी न जाता वाचनाकडे वळावे. वाचाल तर वाचाल असा संदेश देत त्यांनी वाचनाचे असणारे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले. बीए भाग तीनची विद्यार्थिनी श्रावणी अडसूळ हिने मनोगत व्यक्त केले. सहाय्यक ग्रंथपाल जितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. एनसीसी प्रमुख प्रा. मेजर सुनिता भोसले प्रा. रोहिणी रेळेकर व ग्रंथालयातील सर्व स्टाफ व बहुसंख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत 17/10/25

# 'विवेकानंद'तर्फे करमाळा येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत

कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने केलेल्या आवाहनानुसार विवेकानंद कॉलेजने राज्यातील पूरग्रस्त भागातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि.सोलापूर येथील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थ्यांनी स्वइच्छेने आर्थिक मदत केली. यात १ लाख २८ हजार ६५० इतकी रक्कम जमा झाली.

यावेळी प्रत्यक्ष करमाळा, सोलापूर येथील विविध भागात जाऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त समितीने पाहणी करुन यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि.सोलापूर येथील विद्यार्थ्यांना किट, वह्या, फराळाचे पदार्थ इत्यादीचे वाटप केले व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर प्रवास खर्च व कपडेखरेदीसाठी रक्कम वर्ग करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांनी पुढाकार घेतला. या उपक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शना खाली डॉ. एस. पी. थोरात, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.श्रुती जोशी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, डॉ. एस. आर. कट्टीमनी, डॉ. ए एस कुंभार, डॉ. आरिफ महात, डॉ. एस एस अंकुशराव, प्रा ए बी वसेकर, रजिस्ट्रार एस के धनवडे यांनी केले.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २५ ऑक्टोबर २०२५

# भर पावसात मनपास्तर मैदानी स्पर्धा



कोल्हापूर : मनपास्तर शालेय मैदानी स्पर्धेतील चुरशीचा एक क्षण. (छाया : मिलन मकानदार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा क्रीडा कार्यालय व महानगरपालिकेतर्फे आयोजित आणि कोल्हापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्यातून मनपास्तर शालेय मैदानी स्पर्धांना शुक्रवारी प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी भर पावसात शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर ही स्पर्धा रंगली.

दोनदिवसीय या स्पर्धेचे संयोजन क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, प्रा. प्रफुल मांगोरे पाटील, महेश सूर्यवंशी, शामराव मासाळ व सहकाऱ्यांनी केले आहे. स्पर्धेच्या विविध खेळ प्रकारांतील वैयक्तिक क्रीडा प्रकारात प्रथम दोन आणि रिलेमधील प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंची निवड डेरवण (जि. रत्नागिरी) येथे दि. २८ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी होणार आहे. पहिल्या दिवशीच्या विविध खेळ प्रकारातील विजेते-उपविजेते स्पर्धक असे : १९ वर्षांगट मुले : धावणे : १०० मीटर - सम्राट पाटील (गोखले कॉलेज), कनकराज संघवी (शांतिनिकेतन). ४०० मी. - करण कदम (नाईट कॉलेज), स्वयम पाटील (न्यू कॉलेज). ८०० मी. -संग्राम चनगर (नाईट कॉलेज), शिरीष कोडके (शहाजी कॉलेज). ३००० मी. - प्रतीक चौगुले (शहाजी कॉलेज), आदित्य पाटील (विद्यापीठ कॉलेज). ११० मी. अडथळा - श्रीहरी शिंपुगडे (विवेकानंद कॉलेज), शुभम महाडिक (छत्रपती शाहू हायस्कूल). तिहेरी उडी - धनराज पाटील (समलोहिया), हर्षवर्धन गायकवाड (न्यू कॉलेज). गोळा फेक - अनिरुद्ध पाटील (नाईट कॉलेज), यश पाटील (न्यू कॉलेज). भालाफेक - मनोज चव्हाण (महावीर कॉलेज), विश्वजीत कमलाकर (शांतिनिकेतन). ४ X १०० रिले - शांतिनिकेतन. १९ वर्षांगट मुली : १०० मी. धावणे - पूर्वा माळवी (न्यू कॉलेज), मीनल साळुंखे (डीआरके). ४०० मी. - रिफत रेहमान (शांतिनिकेतन), शीतल कोकरे (विवेकानंद कॉलेज). ८०० मी. - रिफत रेहमान, श्रीनिधी खोत (न्यू कॉलेज). ३००० मी. - कीर्ती पवार (विद्यापीठ कॉलेज), शीतल खोत (विद्यापीठ कॉलेज), तिहेरी उडी : मीनल साळुंखे (डी आर के), पूर्वा माळवी (न्यू कॉलेज), गोळाफेक- उत्कर्षा गुरव (जी के जी कॉलेज), वैभवी चौगुले (विवेकानंद कॉलेज), भालाफेक : वेदिका पाटील (डी वाय पाटील), वैभवी येडूरकर (कमला कॉलेज). ४ X १०० रिले : न्यू कॉलेज.

# सम्राट, पूर्वा, सुवेद, चिन्मयी आदी चमकले

## मनपा, जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे मैदानी स्पर्धा : विद्यार्थ्यांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे आयोजित मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणे प्रकारात सम्राट पाटील, पूर्वा माळवी, सुवेद भोसले, चिन्मयी पुंगावकर, हर्षवर्धन मिरजकर व देविका देसाई यांनी आपापल्या गटात प्रथम क्रमांक पटकाविला. शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर स्पर्धेचे आयोजन केले आहे.




कोल्हापूर : महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर आयोजित मैदानी स्पर्धेत गोळाफेक करताना खेळाडू. दुसऱ्या छायाचित्रात उंच उडी मारताना खेळाडू.

### १४ वर्षांखालील मुले

■ १०० मीटर धावणे : सुवेद भोसले (छत्रपती शाहू हायस्कूल), शार्दुल खोपडे (स. म. लोहिया हायस्कूल), आदित्य पाटील (दत्ताबाळ हायस्कूल). ४०० मीटर - राजवीर कदम (शांतिनिकेतन), श्रीनिधी सालपुते (छत्रपती शाहू विद्यालय), अथर्व मुतार (शीलादेवी हायस्कूल). ६०० मीटर - आदित्य शेळके (डी. वाय. पाटील विद्यानिकेतन), आराध्य कुंभार (संजीवन इंग्लिश मीडियम स्कूल), राजवर्धन गायकवाड (स. म. लोहिया हायस्कूल). ८० मीटर हर्डल - शिवम मगदूम (डी. वाय. पाटील विद्यानिकेतन), साहील राठोड (तपोवन हायस्कूल), सोहम जाधव (न्यू मॉडेल). उंच उडी - शिवम मगदूम, महमंदकैफ पठाण (कोरगावकर हायस्कूल). गोळा फेक - आर्गेन बनसोडे (राधाबाई इंग्लिश मीडियम), संतोष पुरके (राजर्षी शाहू हायस्कूल), यश बोडके (राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल). ४ बाय १०० रिले - स. म. लोहिया हायस्कूल, नागोजीराव पाटणकर हायस्कूल, जीवन कल्याण प्राथमिक विद्यालय.

### १४ वर्षांखालील मुली

■ १०० मीटर धावणे : चिन्मयी पुंगावकर (छत्रपती शाहू विद्यालय), राजवी पाटोळे (पोवार हायस्कूल), येसू पाटील (प्रायव्हेट हायस्कूल). ४०० मीटर - राजवी पाटोळे, तन्वी डोंबळे (वि. स. खांडेकर हायस्कूल), दिव्या शेवडे (छत्रपती शाहू विद्यालय). ६०० मीटर - तन्वी डोंबळे, प्रणिती कदम (ताराराणी विद्यापीठ), प्रतीक्षा बनसोडे (ताराराणी विद्यापीठ). ८० मीटर हर्डल - आराध्या महाडिक (विमला गोयंका), सुही आडसुळे (उषाराजे हायस्कूल), चिन्मयी पुंगावकर. उंच उडी - आराध्या महाडिक, आरोही पुजारी (कोरगावकर हायस्कूल), आराध्या येसणे (छत्रपती शाहू विद्यालय सीबीएसई). गोळा फेक - गीतिका जाधव (नागोजीराव पाटणकर हायस्कूल), खुशी पोवार (कोरगावकर हायस्कूल), अंजली लांबोरे (राजर्षी छत्रपती शाहू हायस्कूल). ४ बाय १०० रिले - छत्रपती शाहू विद्यालय, उषाराजे हायस्कूल, विमला गोयंका.

**१९ वर्षांखालील मुले :**

१०० मीटर धावणे - सम्राट पाटील (गोखले कॉलेज), कनकराज संघवी (शांतिनिकेतन), सत्यजित पाटील (कॉमर्स कॉलेज). ४०० मीटर - करण कदम (नाईट कॉलेज), स्वयम पाटील (न्यू कॉलेज), शुभम महाडिक (शाहू हायस्कूल). ८०० मीटर - संग्राम धनगर (नाईट कॉलेज), शिरीष बोडके (शहाजी कॉलेज), ओम आडसूळ (महावीर कॉलेज). ३००० मीटर - प्रतीक चौगुले (शहाजी महाविद्यालय), आदित्य पाटील (विद्यापीठ कॉलेज), प्रतीक कांबळे (विवेकानंद कॉलेज). ११० मीटर हर्डल - श्रीहरी शिंदुगडे (विवेकानंद महाविद्यालय), शुभम महाडिक (शाहू हायस्कूल), निशांत कोळी (राजाराम महाविद्यालय). तिहेरी उडी - धनराज पाटील (लोहिया हायस्कूल), हर्षवर्धन गायकवाड (न्यू कॉलेज), शुभम महाडिक (शाहू हायस्कूल). गोळा फेक - अनिरुद्ध पाटील (नाईट कॉलेज), यश पाटील (न्यू कॉलेज), अभिमन्यू हळदकर (शिवाजी मराठा). भालाफेक - मनोज चव्हाण (महावीर महाविद्यालय), विश्वजित कमलाकर (शांतिनिकेतन). ४ बाय १०० मीटर रिले - शांतिनिकेतन, लोहिया हायस्कूल, न्यू कॉलेज.

**१९ वर्षांखालील मुली :**

१०० मीटर धावणे : पूर्वा माळवी (न्यू कॉलेज), मीनल साळुंखे (कॉमर्स कॉलेज), श्रीरक्षा खोत (न्यू कॉलेज). ४०० मीटर - रिफत रेहमान (शांतिनिकेतन), श्रीनिधी खोत (न्यू कॉलेज), वैभवी कांबळे (विद्यापीठ कॉलेज). ३००० मीटर - कीर्ती पवार (विद्यापीठ कॉलेज), शीतल खोत (विद्यापीठ कॉलेज), पूर्वा पाटील (संजीवनी हायस्कूल). तिहेरी उडी - मीनल साळुंखे, पूर्वा माळवी. गोळा फेक - उत्कर्षा गुरव (गोखले कॉलेज), वैभवी चौगुले (विवेकानंद कॉलेज), दीक्षा व्हराबळे (न्यू कॉलेज). भाला फेक - वेदिका पाटील (डी. वाय. पाटील कॉलेज), वैभवी येडूरकर (कमला महाविद्यालय), मनीषा कोळपते (विद्यापीठ हायस्कूल). ४ बाय १०० रिले - न्यू कॉलेज, शांतिनिकेतन, कमला कॉलेज.

**१७ वर्षांखालील मुले :**

१०० मीटर धावणे : हर्षवर्धन मिरजकर (विमला गोयंका), उत्कर्ष पाटील-मांगोरे (न्यू कॉलेज), हर्षल करनाळे (विमला गोयंका). ८०० मीटर - ओंकार डुबल (माईसाहेब बावडेकर), प्रेम प्रसाळे (क्रांतिज्योती महात्मा फुले हायस्कूल), सिद्धेश पंडित (सेंट झेवियर्स). ३००० मीटर - राणोजीराजे निंबाळकर (शाहू विद्यालय), समीर पाटील (महावीर महाविद्यालय), स्वयंम पोवार (माईसाहेब बावडेकर). ११० मीटर हर्डल - उत्कर्ष पाटील-मांगोरे, पृथ्वीजित पिसाळ (शाहू विद्यालय), नैतिक देसाई (न्यू मॉडेल). उंच उडी - तेजस पाटील (न्यू कॉलेज), अर्जुन आळवेकर (विमला गोयंका स्कूल), राजवीर दुमाले (आदर्श प्रशाळा). तिहेरी उडी - सार्थक कदम (न्यू कॉलेज), रमजान शेख (शाहू महाराज हायस्कूल), प्रसन्नजित माजगावकर (कोरगावकर हायस्कूल). भाला फेक - सोहम चिखले (नाटे स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज), शंभूराजे मांगोरे (संजीवन पन्हाळा), संदीप कोडेकर (पाटणकर हायस्कूल).

**१७ वर्षांखालील मुली :**

१०० मीटर धावणे : देविका देसाई (उषाराजे हायस्कूल), सान्वी जगताप (आर. एस. स्लोकल), तेजस्विनी पाटील (होलीक्रॉस). ४०० मीटर - देविका देसाई, स्वाली चव्हाण (विवेकानंद महाविद्यालय), तेजस्विनी पाटील (सेंट झेवियर्स). ८०० मीटर - पूर्वा पाटील (उषाराजे हायस्कूल), वैष्णवी मुदे (उषाराजे हायस्कूल), अमृता बिडवे (शीलादेवी तपोवन). ३००० मीटर - स्वरा चौगुले (शाहू दयानंद कॉलेज), हर्षदा दळवी (इंदुमती हायस्कूल). १०० मीटर हर्डल - अक्षरा मोरे (शहाजी कॉलेज), श्रेया खुपेरकर (सेंट झेवियर्स). उंच उडी - नीलम जाधव (न्यू कॉलेज), भक्ती गेजगे (कोरगावकर हायस्कूल), श्रावणी लोहार (शाहू हायस्कूल). तिहेरी उडी - भक्ती गेजगे. भाला फेक - विद्या कोरे (प्रबुद्ध भारत हायस्कूल), शांभवी हिरेमठ (शाहू हायस्कूल), लक्ष्मी जांभळे (प्रबुद्ध भारत हायस्कूल). ४ बाय १०० रिले - उषाराजे हायस्कूल, शांतिनिकेतन, नागोजीराव पाटणकर हायस्कूल.

सकाळ TODAY
कोल्हापूर, रविवार, २६ ऑक्टोबर २०२५



कोल्हापूर : दसरा चौक येथे मंगळवेढा येथील वारी परिवार सायकल मोहिमेतील कार्यकर्त्यांचे स्वागत करताना पदाधिकारी.

# शाश्वत प्रतिष्ठानतर्फे वारी परिवाराचे स्वागत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : शाश्वत प्रतिष्ठान कोल्हापूरच्या वतीने मंगळवेढा येथील वारी परिवार सायकल क्लब यांच्यातर्फे शेतकरी राजाच्या सन्मानार्थ आयोजित मंगळवेढा ते पन्हाळगड या सायकल मोहिमेचे दसरा चौक येथे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा शुभांगी गावडे यांच्या हस्ते प्रतिष्ठानचे स्मृतिचिन्ह व झाडाचे रोप देऊन स्वागत करण्यात आले. अध्यक्षस्थानी अश्विन आजरेकर होते.

गावडे म्हणाल्या, 'अशा या मोहिमांमधून समाज प्रबोधनाच्या कार्याबरोबरच इतिहास आणि निसर्ग संवर्धनाचे कार्य साधले जाते. अशा स्तुत्य उपक्रमास नेहमीच आमचा पाठिंबा राहील,' असे मत व्यक्त केले. यावेळी वारी परिवारचे प्रा. विनायक कलुबर्मे यांनी परिवाराच्या कार्याची माहिती देऊन शाश्वत प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गुरुदत्त म्हैसगुत, उपाध्यक्ष राहुल चौधरी, संचालक डॉ. धीरज शिंदे, संतोष पाव, सुमित जामसांडेकर, नरेश पांचाळ, राहुल चव्हाण, डॉ. सुनील भोसले, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. मधुकर पाटील आदी उपस्थित होते.

दैनिक महासत्ता | गुरूवार, ता.३० ऑक्टोबर २०२५

# अजय जाधवची आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

वारणानगर, ता.२९ (प्रतिनिधी)-

कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद



अंतर्गत आयोजित शिवाजी विद्यापीठ विभागीय जलतरण स्पर्धेत २०० मीटर बटर फ्लाय व २०० मी ब्रेस्ट स्ट्रोक या प्रकारात तळसंदे (ता.हातकणंगले) येथील अजयराज जाधव याने तृतीय स्थान मिळवले आहे. या यशामुळे आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

राजर्षी छ.शाहू कॉलेज कोल्हापूर येथे या स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेसाठी देवचंद कॉलेज अर्जुननगर, डीकेटीई इचलकरंजी, घाळी कॉलेज गडहिंग्लज, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, डी. वाय.पाटील इंजिनिअरिंग कॉलेज साळोखेनगर, शाहू कॉलेज, डी. वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस तळसंदे आदी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये २०० मी बटर फ्लाय व २०० मी ब्रेस्ट स्ट्रोक या खेळ प्रकारात डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पसमधील विद्युत अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षात शिकत असलेला अजयराज जाधव याने तिसरा क्रमांक मिळवत राजर्षी छ. शाहू कॉलेज कोल्हापूर येथे होणाऱ्या आंतरविभागीय जलतरण स्पर्धेसाठी पात्र झाला. डी. वाय. पाटील टेक्निकल विभागीय संचालक डॉ.सतिश पावसकर यांनी अजयराज जाधव आणि जिमखाना प्रमुख विनोद उतळे यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी.पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज उर्फ बंटी डी.पाटील, विश्वस्त माजी आमदार ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, विश्वस्त तेजस पाटील, संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ.ए.के.गुप्ता यांचे प्रोत्साहन लाभले.

PB 31.10.25

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५

# 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धा उद्यापासून

## २४ एकांकिका; देवल क्लबमध्ये प्राथमिक फेरी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : महाविद्यालयीन कलाकारांसाठीच्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवार (ता. ३१) पासून प्रारंभ होणार आहे.

महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे), देवल क्लब, शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात रसिकांना सलग तीन दिवस २४ एकांकिकांची पर्वणी मिळणार आहे.

### स्पर्धेतील एकांकिका अशा...

- **शुक्रवारी (ता. ३१) सकाळी नऊपासून**
- श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (माने वळून बघू नकोस)
- भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय (हमको हिंदी नाही आती!)
- राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, इस्लामपूर (एका लेखकाची अर्धवट राहिलेली गोष्ट)
- नाईट कॉलेज, इचलकरंजी (तमाशा)
- विवेकानंद कॉलेज (लेबल)
- **सायंकाळी चारनंतर**
- डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज (सवाशी भवानी चौकामध्ये)
- कर्मवीर भाऊराव पाटील मॅनेजमेंट स्टडिज ॲंड रिसर्च, सातारा (नवरा नको गं बाई)
- आर्टस् व कॉमर्स महाविद्यालय, नागठाणे (सोयरिक)
- गोविंदराम सक्सेरिया विज्ञान महाविद्यालय, बेळगाव (असं हे असे लिहावे)
- डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक (गरम चाय की प्याली)
- राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, इस्लामपूर (हाफवे)



- **शनिवारी (ता. १) सकाळी नऊपासून**
- न्यू कॉलेज (घरोट)
- आजरा महाविद्यालय (आर या पार)
- भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय (एक डॉट)
- शहाजी लॉ कॉलेज (अर्थाच्या शोधात)
- कॉमर्स कॉलेज (ग्वाही)
- **सायंकाळी चारनंतर**
- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (इ दिनगुलिओ केले जावे)
- पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट, बुधगाव (स्काय वॉक)
- चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगली (अव्यक्त)
- डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग (मिठाई)
- दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी (कुपन)
- शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभाग (अ युजलेस जीनिअस)

- **रविवार (ता. २) सकाळी नऊपासून**
- दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी (घबाड)
- डी. वाय. पाटील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर (फितूर तो चंद्र)
- डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, कोल्हापूर (पेंडल)
- संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (अस्तित्व)

दैनिक जनप्रवास
बातम्यांचा राजा

शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५

# पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचे आज उद्घाटन

जनप्रवास : कोल्हापूर

पुण्यातील महाराष्ट्रीय कलोपासक, गायन समाज देवल क्लब आणि शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले आहे. प्राथमिक फेरीचे उद्घाटन ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता कोल्हापूर केंद्रावर देवल क्लबमधील गोविंदराव टेंबे रंगमंदिरमध्ये होणार आहे.

एकांकिका स्पर्धेत पहिल्यांदा इचलकरंजी येथील श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे मागे वळून बघू नकोस, कोल्हापुरातील भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'हमको हिन्दी नही आती.' इस्लामपूर येथील राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'एका लेखकाची अर्धवट राहिलेली गोष्ट.' इचलकरंजीतील नाईट कॉलेजचे तमाशा, कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजचे लेबल एकांकिका सादर होणार आहेत. त्याच शनिवार १ नोव्हेंबर रोजी कोल्हापुरातील कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे इ दिनगुलिओ केले जाते, बुधगाव येथील पद्मभूषण वसंतराव दादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे 'स्काय वॉक', सांगलीतील चिंतामणीराव व्यापार महाविद्यालयाचे 'अव्यक्त', डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे 'मिठाई,' इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे 'कुपन', शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे 'अ युजलेस जीनियस' या एकांकिकेचे सादरीकरण होणार आहे.

# कोल्हापुरात आजपासून पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेस प्रारंभ

**कोल्हापूर :** पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवार (दि. ३१) पासून प्रारंभ होणार आहे. देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंगमंदिरात २ नोव्हेंबरपर्यंत रसिकांना २६ एकांकिकांची पर्वणी मिळणार आहे. सकाळी ९ ते १ व दुपारी ४ ते ८ या वेळेत सादरीकरण होणार आहे.

**स्पर्धेतील एकांकिका अशा...**

शुक्रवारी सकाळी ९ ते १ : श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (मागे वळून बघू नकोस), भारती विद्यापीठाचे अभियांत्रिकी महाविद्यालय (हमको हिंदी नही आती!), राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर (एका लेखकाची अर्धवट राहिलेली गोष्ट), नाईट कॉलेज, इचलकरंजी (तमाशा), विवेकानंद कॉलेज (लेबल).

दुपारी ४ ते ८ : डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज (सवारी भवानी चौकामध्ये), कर्मवीर भाऊराव पाटील मॅनेजमेंट स्टडिज अँड रिसर्च, सातारा (नवरा नको गं बाई), आर्टस् व कॉमर्स महाविद्यालय, नागठाणे (सोयरीक), गोविंदराम सक्सेरियन विज्ञान महाविद्यालय, बेळगाव (असं हे असे लिहावे), - डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक (गरम चाय की प्याली), राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, ईश्वरपूर (हाफ्ते).